**मे. समृध्दी शुगर्स लिमिटेड, गट नं. १११, ११९, १२०, १२२, १२३, १२४, १२५, १४६ व १७३ गाव देवीदहेगाव, ता. घनसावंगी, जि. जालना या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये साखर कारखाना २५०० टन प्रतिदिन वरून ७५०० टन प्रतिदिन पर्यंत विस्तार आणि नवीन ११० किलो लिटर प्रतिदिन ऊस सिरप/मोलॅसीस आधारीत आसवणी प्रकल्प उत्पादन करणे बाबत दिनांक ०४/०१/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता मे. समृध्दी शुगर्स लिमिटेड., गाव देवीदहेगाव, ता. घनसावंगी, जि. जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त: -**

---

मे. समृध्दी शुगर्स लिमिटेड, गट नं. १११, ११९, १२०, १२२, १२३, १२४, १२५, १४६ व १७३ गाव देवीदहेगाव, ता. घनसावंगी, जि. जालना या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये साखर कारखाना २५०० टन प्रतिदिन वरून ७५०० टन प्रतिदिन पर्यंत विस्तार आणि नवीन ११० किलो लिटर प्रतिदिन ऊस सिरप/मोलॅसीस आधारीत आसवणी प्रकल्प उत्पादन करणे बाबत दिनांक ०४/०१/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता मे. समृध्दी शुगर्स लिमिटेड., गाव देवीदहेगाव, ता. घनसावंगी, जि. जालना येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-८५/ २०२३ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २३१२०७- एफटीएस-०३०० दि. ०७/१२/२०२३ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. **श्री. केशव नेटके,** : अध्यक्ष
अप्पर जिल्हादंडाधिकारी, जालना.

२. **श्री. सो. म. कुरमुडे,** : समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना.

श्रीमती. सीमा मांगुळकर, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. समृध्दी शुगर्स लिमिटेड, गट नं. १११, ११९, १२०, १२२, १२३, १२४, १२५, १४६ व १७३ गाव देवीदहेगाव, ता. घनसावंगी, जि. जालना यांच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये साखर कारखाना २५०० टन प्रतिदिन वरून ७५०० टन प्रतिदिन पर्यंत विस्तार आणि नवीन ११० किलो लिटर प्रतिदिन ऊस सिरप/मोलॅसीस आधारीत आसवणी प्रकल्प उत्पादन करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी जमलो आहोत. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर,

२००६ च्या अधिसूचनेनुसार 'अ' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. समृध्दी शुगर्स लिमिटेड यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दिं. १४/०८/२०२३ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी जालना यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दिं. ०४/०१/२०२४ वेळ-दूपारी १२.०० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. ०२/१२/२०२३ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
२. जिल्हा परिषद, जालना.
३. जिल्हा उद्योग केंद्र, जालना.
४. तहसिलदार, तहसिल कार्यालय, घनसांवगी.
५. ग्रामपंचायत कार्यालय, कोठाळा ब्रु., घाणेगाव, सिंदखेड, देविदहेगाव, पाडूळी खू., मच्छिंद्रनाथ चिंचोली, भेंडाळा, ता. घनसांवगी, जि. जालना.
६. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, छत्रपती संभाजी नगर.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
९. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना येथे एक सूचना इमेलद्वारे प्राप्त झाली त्याची नोंद घेण्यात आली आहे व सोबत जोडण्यात येत आहे. तरी उपस्थित नागरिकांमधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर नोंदवू शकतात.

त्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना तथा समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी सर्वप्रथम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे आजूबाजूच्या गावातील उपस्थित सर्व नागरिकांचे स्वागत केले. तसेच पूढे त्यांनी, श्रीमती. सीमा मांगुळकर, क्षेत्र अधिकारी यांनी अगोदर सांगितल्याप्रमाणे आक्षेप/टिका/टिप्पणी बाबत थोडक्यात विषद केले. तसेच त्यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, अजूनही आपले काही आक्षेप/टिका/टिप्पणी असतील तर ते आपण प्रकल्पाचे

सादरीकरण झाल्यानंतर विचारावेत. तदनंतर त्यांनी, सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

डॉ. हेमांगी नलावडे, प्रकल्प सल्लागार, मे. मिटकॉन कन्सल्टन्सी अँण्ड इंजिनीयरींग सर्व्हिसेस लि., पुणे यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे यांनी सांगितले की, सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे उपस्थित नागरिकांनी त्यांचे जे काही प्रश्न आक्षेप/टिका/टिप्पणी असतील ते केवळ पर्यावरण विषयक विचारावेत.

त्यानंतर प्रस्तावित प्रकल्पाबाबत खालील प्रमाणे सूचना/हरकती/आक्षेप इत्यादी प्राप्त झाले. त्याचे प्रकल्पा व्यवस्थापकाच्या वतीने त्यांचे सल्लागार/प्रतिनीधी यांनी दिलेले उत्तर/आश्वासन खालीलप्रमाणे आहेत-

| अ.क्रं. | केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव. | उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर. |
|---|---|---|
| १. | **श्री. अमोल बद्रीनारायण आडूळे, रा. सिंदखेड, ता. घनसावंगी, जि. जालना** यांनी विचारले की, आमचे गाव प्रकल्पापासून ३ कि.मी. अंतरावर आहे तर या प्रकल्पामध्ये आजूबाजूच्या स्थानिक नागरिकांना रोजगार मिळेल का. | **यावर प्रकल्प सल्लागार,** यांनी सांगितले की, या नविन आसवणी प्रकल्पामध्ये जवळपास ५०० कामगार लागणार आहेत. बांधकाम टप्यात तसेच प्रकल्प सूरू झाल्यानंतर कूशल कामगार लागणार आहेत. यामध्ये जास्तीत जास्त स्थानिक नागरिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. |
| २. | **श्री. भरत सुदामराव शिंदे, रा. सिंदखेड, ता. घनसावंगी, जि. जालना** यांनी विचारले की, या नविन आसवणी प्रकल्पामधून निघणारे टाकाउ पदार्थ यापासून काही नूकसान किंवा फायदा होणार आहे का. | **यावर प्रकल्प सल्लागार,** यांनी सांगितले की, या प्रकल्पामधून टाकाउ पदार्थ हे पाण्याच्या स्वरूपात तसेच घनकचराच्या स्वरूपात बाहेर पडतात. घनकचरा म्हणजे बगॅसची अँश, प्रेसमड आणि स्पेंट वॉश पावडर हे सर्व पोटॅशियमयुक्त असल्यामूळे याचा शेतात खत म्हणून वापर करण्यात येतो. तसेच हवेच्या प्रदूषणासाठी कारखाना प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा जसे बॉयलर ला अत्याधूनिक यंत्रणा इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसीपिटेटर बसविण्यात येणार आहे त्यामूळे कूठल्याही |

| | | |
|---|---|---|
| | | प्रकारच्या प्रदूषणाचा त्रास होणार नाही, आणि उत्पादनातून कार्बन डायऑक्साइडची निर्मीती होणार आहे त्याचा विविध औद्यागिक उत्पादनामध्ये प्रक्रिया करून वापर करण्यात येणार आहे. |
| ३. | **श्री. विठल दादाराव मुळक, रा. म. चिंचोली ता. घनसावंगी, जि. जालना** यांनी विचारले की, कारखान्यातून निघणा-या वेस्टेज पाण्यासाठी काय उपाययोजना केलेल्या आहेत. | **यावर प्रकल्प सल्लागार,** यांनी सांगितले की, सदर कारखाना हा Zero Liquid Discharge (ZLD) वर आधारीत आहे म्हणजे साखर कारखान्यातून निघणारे आद्योगिक सांडपाण्यासाठी अत्याधूनिक सीपीयु ही यंत्रणा बसविण्यात येणार आहे ज्यामधून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा उत्पादनात वापर करण्यात येणार आहे. तसेच अत्याधूनिक ईटीपी बसविण्यात येणार आहे त्यामधून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा जास्तीत जास्त पूर्नवापर करण्यात येणार असून उरलेले सांडपाणी कारखाण्याच्या मालकीच्या जमीनीवर शेतीसाठी वापरण्यात येणार आहे. तसेच आसवणी प्रकल्पामधून निघणारे स्पेंट वॉश हे एम.ई.ई. मध्ये प्रक्रिया करून Zero Lquied Discharge करण्यात येणार आहे त्यामूळे कूठलेही सांडपाणी कारखाण्याच्या बाहेर जाणार नाही. |
| ४. | **श्री. दृषक छबूराव इगाडे, रा. करडगाव, ता. घनसावंगी, जि. जालना** यांनी विचारले की, सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे सीएसआर निधी कशा प्रकारे सामाजिक कार्यक्रमासाठी वापर करण्यात येणार आहे यासाठी काही आराखडा तयार आहे का. | **यावर प्रकल्प सल्लागार,** यांनी सांगितले की, प्रकल्पाच्या आजूबाजूच्या गावामध्ये जवळपास १० कि.मी. अंतराच्या आत हा सीएसआर खर्च करण्यात येतो. |
| ५. | **श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी** यांनी सांगितले की, सीएसआर फंड कशा प्रकारे व किती टप्यात नियोजन/वापरण्यात येणार आहे याबाबत सांगावे. | **यावर प्रकल्प सल्लागार,** यांनी सांगितले की, सामाजिक पर्यावरणी जबाबदारी सीएसआर उपक्रमासाठी आराखडा तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये आजूबाजूच्या पर्यावरणा संबंधित कार्यक्रम, वृक्षारोपण, पाणी साठवणूक टाक्या, पाणलोट क्षेत्र विकास व सौर उर्जा वापरून वीज तयार करणे चा समावेश आहे. तसेच हा खर्च गावातील नागरिकांना सोबत बैठक गावातील दुर्बल घटकांच्या गरजेनूसार मा. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शक तत्वानूसार सदरचा खर्च येत्या वर्षांमध्ये टप्या टप्यात करण्यात येणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| ६. | **श्री. सोमनाथ जाधव, रा. खडका, ता. घनसावंगी, जि. जालना** यांनी विचारले की, सदरच्या कारखाण्यात काम करत असताना अंगावर काजळी पडल्यास त्याचा आरोग्यावर काय परिणाम होइल का. | **यावर प्रकल्प सल्लागार**, यांनी सांगितले की, कारखाण्याच्या धूरातून पडणारी काजळी ही घातक स्वरूपाची नाही. परंतू कामगारांनी नेहमी हेल्मेट, मौजे म्हणजेच सुरक्षा किटचा वापर करावा जेणेकरून आरोग्याच्या समस्या निर्माण होणार नाही. |
| ७. | **श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी** यांनी विचारले की, सदरच्या प्रस्तावित प्रकल्पाला पाण्याचा स्त्रोत कसा आणि कूठून आहे आणि असेल तर त्यासाठी CGWA ची आपण परवानगी घेतली आहे काय. तसेच सद्यस्थितीत सूरू असलेल्या कारखाण्यासाठी स्त्रोत कोणता आहे. | **यावर प्रकल्प सल्लागार**, यांनी सांगितले की, प्रस्तावित नविन प्रकल्पासाठी लघू पाटबंधारे अंतर्गत देहिदहेगावातील पाण्याच्या तलावामधून स्त्रोत आहे. तसेच सद्यस्थितीत असलेल्या प्लांटसाठी देहिदहेगाव येथील तलावमधूनच स्त्रोत आहे. |

श्री. केशव नेटके, अप्पर जिल्हादंडाधिकारी जालना तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी सांगितले की, मे. समृध्दी शुगर्स लिमिटेड या प्रकल्पाच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये साखर कारखाना २५०० टन प्रतिदिन वरून ७५०० टन प्रतिदिन पर्यंत विस्तार आणि नवीन ११० किलो लिटर प्रतिदिन ऊस सिरप/मोलॅसीस आधारीत आसवणी प्रकल्प उत्पादन करणे बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी आयोजित केलेली आहे. याबाबतचे सादरीकरण/आराखडा येथे मांडलेला आहे. सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी दरम्यान नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्न/सूचना/टिका व त्यावर प्रकल्प सल्लागार यांनी दिलेली उत्तरे यांची येथे नोंद घेण्यात आलेली आहे तसेच या सर्व बाबींचा सविस्तर रीतीने इतिवृत्तात समाविष्ट करण्यात येईल. तदनंतर शेवटी त्यांनी उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली असे जाहीर केले.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

**सो. म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, जालना.

**केशव नेटके**
(अध्यक्ष)
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी जालना.